
ePaper

## अदानींच्या कंपन्यांची मुख्यालये मुंबईहून गुजरातमध्ये!

|| वर्ष - 6 | अंक - 342 || UDYAM-MH-26-0158827 ||





# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत


- अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना ७३ कोटींची नुकसान भरपाई
- 'मोदी हटवा, देश वाचवा'चा नारा!
- राज्यात 'रामनवमी पॅटर्न' सुरू झालाय


www.mahaenews.com | शनिवार, दि.1 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मिळकतकर वसुलीचे 'रेकॉर्ड ब्रेक'

## कर संकलन विभागाची कामगिरी : 40 वर्षांच्या इतिहासात प्रथमच 810 कोटींचा 'गल्ला'

**।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने 2022-23 या आर्थिक वर्षात तब्बल 810 कोटी रुपयांची कर वसूल केला आहे. महापालिकेच्या 40 वर्षांच्या इतिहासात प्रथमच 810 कोटींचा टप्पा पार केला असून हा एक माईलस्टोन ठरला आहे.**




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर प्रमुख स्त्रोत आहे. महानगरपालिका हद्दीत 5 लाख 97 हजार 487 मालमत्ता आहेत. 2022-23 या आर्थिक वर्षात यापैकी सव्वा चार लाख मालमत्ता धारकांनी कराचा भरला आहे. कर संकलन व कर आकारणी विभागाने गतवर्षी 628 कोटींचा कर वसूल केला होता. यंदा कराच्या वसुलीत तब्बल 182 कोटी म्हणजे 35 टक्के अधिक कर वसूल करण्यात महापालिकेला यश आले आहे. यंदा कर वसुलीसाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, नळ कनेक्शन तोडणे, बड्या थकबाकीदारांची वर्तमान पत्रात नावे प्रसिद्ध करणे, मीम्स सारखी अनोखी स्पर्धा, शहरात वर्दळीचे ठिकाण, मुख्य चौक , रस्ते इ. ठिकाणी होर्डींग्ज व फ्लेक्स द्वारे जाहिरात प्रसिद्धी, पॅम्पलेट वाटप, सोशल मिडीया द्वारे चित्रफीत, जनजागृतीसाठी रिक्षाद्वारे लाऊडस्पिकरवर जिंगलद्वारे जाहिरात प्रसिद्धी, कर संवाद अशा माध्यमातून करदात्या थकबाकीदारांमध्ये वेळोवेळी जनजागृती करण्यात आली. मालमत्ता कर वसुलीसाठी नागरीकांना मालमत्ता कराची बिल ऑनलाईन तसेच कर भरण्यासाठी ऑनलाईन व ऑफलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. मालमत्ताधारकांचे विविध घटकांसाठी ऑनलाईन व ऑफलाईन कर सवलत योजना, थकित कर वसुलीसाठी वेळोवेळी घरभेटी देणे, पत्र देणे, जप्तीपुर्व नोटीसा देण्याची कार्यवाही करण्यात आली.

### कार्यालयीन कामकाजातील सुलभता

स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंदीसाठी माझी मिळकत माझी आकारणी योजना. मालमत्ता करातील विविध सवलत योजनांचा लाभ घेणेकामी नागरिकांना अर्ज करणेकामी ऑनलाईन अर्ज करणेची सुविधा. नागरिकांसाठी मालमत्ता कर थकबाकी नसलेचा दाखला प्राप्त करून घेणेसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध. नागरिकांना ऑनलाईन मालमत्ता हस्तांतरण अर्ज करणेची सुविधा, तसेच सर्व कामकाज ऑनलाईन पध्दतीनेच होत असल्याने वेळेत बचत. मालमत्तेस मोबाईल क्रमांक जोडणेची सुविधा त्यामुळे सर्व मालमत्तांना तात्काळ संपर्क करणे सोयीस्कर. मनपा उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंदीसाठी 'माझी मिळकत माझी आकारणी' ही योजना कार्यान्वीत केल्याने उत्पन्न वाढीस मदत. मालमत्ता करातील विविध सवलत योजनाचा आढावा घेऊन एकसूत्रीपणा व जादाच्या सवलती कमी करून सुलभ सवलत योजनांची अंमलबजावणी धोरण ठरविण्यात आले. हस्तांतर फी वसूलीचे समन्यायी सुधारीत धोरण ठरविण्यात येऊन उत्पन्न वाढीचे दृष्टीने चालू बाजारमुल्यावर आधारीत हस्तांतर फी वसुलीचे धोरण कार्यान्वीत केले. त्यामुळेच 810 कोटी कर वसूल करण्यास यश आले असल्याचे सहाय्यक आयुक्त देशमुख यांनी सांगितले.

### कर वसुलीचा आलेख

| वर्ष | वसुल झालेल्या कराची रक्कम (रुपयात) |
|---|---|
| 2018-19 | : 471 कोटी |
| 2019-20 | : 480 कोटी 7 |
| 2020-21 | : 553 कोटी |
| 2021-22 | : 628 कोटी |
| 2022-23 | : 810 कोटी |

### ऐतिहासिक बाबीं ठळकपणे

- महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदा आठशे कोटींची मजल
- वर्षभरात वसुलीत तब्बल 35 टक्क्यांनी वाढ.
- तब्बल तेरा हजारांवर मालमत्तांची जप्ती अधिपत्रे जारी. दहा हजारांची अंमलबजावणी पूर्ण.
- दोन हजारांपेक्षा जास्त मालमत्ता सील.
- विभागाच्या संपूर्ण सेवा ऑनलाईन.
- पहिल्यांदाच सव्वा चार लाखावर मालमत्तांचा थकीत व चालू कर शंभर टक्के वसूल.
- अनधिकृत बांधकाम शास्तीची टांगती तलवार कायमची दूर. अशा मालमत्ताधारकांकडून तब्बल नव्वद टक्के मूळ कर वसूल

"यावर्षी कर संकलन विभागाने उत्तम कामगिरी बजावली आहे. त्याबद्दल मी कर संकलन विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन करतो. पुढच्या आर्थिक वर्षात मी कर संकलन विभागाला एक हजार कोटींचे उद्दिष्ट दिलेले आहे. त्यासाठी मी विभागाला निरंतर कर वसुली, सर्वंकष मालमत्ता सर्वेक्षण आणि माहितीचे प्रमाणीकरण अशी त्रिसूत्री आखून दिलेली आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक
पिंपरी-चिंचवड मनपा

"माझी नियुक्ती झाल्यावर मी मासिक बैठका घेण्यावर भर दिला. आढावा बैठकीत समस्या जाणून घेऊन त्यावर योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या. वसुलीसाठी अधिकचे MSF जवान उपलब्ध करून देण्यात आले. नळ कनेक्शन बंद करण्यासाठी पाणी पुरवठा विभागाचे प्लंबर मिळण्याची व्यवस्था केली. यंदा कर संकलन विभागाकडेच पाणीपट्टी वसुलीचे काम देण्यात आले आहे.

- प्रदीप जांभळे-पाटील
अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड मनपा

"आठशे कोटींच्या वसुलीचे संपूर्ण श्रेय महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी यांचे आहे. त्यांनी थकबाकी वसुलीसाठी गेल्या वर्षभरात जे कष्ट घेतले त्याला तोड नाही. अनेक खोटे आरोप, तथ्यहीन तक्रारी होऊनही नाउमेद न होता त्यांनी पालिकेचा विश्वास सार्थ ठरवला. त्यातील निवडक अधिकारी आणि कर्मचारी यांचा माननीय आयुक्त यांच्या हस्ते बक्षीस देऊन सत्कार करण्यात येणार आहे.

-निलेश देशमुख, सहायक आयुक्त
कर संकलन व कर आकारणी विभाग



# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना 73 कोटींची नुकसान भरपाई

## शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने या नुकसान भरपाईचे वाटप सुरू

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात गेल्या वर्षीच्या सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या नैसर्गिक आपत्ती व अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे आणि फळपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासाठी ७३ कोटी ६० लाख ३८ हजार रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे.**

अतिवृष्टीमध्ये किमान ३३ टक्के नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ऑनलाईन पद्धतीने या नुकसान भरपाईचे वाटप सुरु करण्यात आले असून आतापर्यंत ८० टक्के वाटप पूर्ण झाले आहे. याचा जिल्ह्यातील ८५ हजार ४४५ शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी हिंमत खराडे यांनी सांगितले.

दरम्यान, यंदाच्या मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ८४ गावांतील १ हजार ४३४ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील ४०८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यासाठी ७० लाख ७० हजार रुपयांचे अनुदानाची मागणी करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या अतिवृष्टीमुळे भोर तालुक्यातील ७८ गावांमधील ५२३ शेतकऱ्यांना २३ लाख १०



हजार रुपये, वेल्हे तालुक्यातील ११ शेतकऱ्यांना ३९ हजार रुपये, मावळ तालुक्यातील ११४ शेतकऱ्यांना ३ लाख २६ हजार रुपये,

हवेली तालुक्यातील ७ हजार ४९० शेतकऱ्यांना ८ कोटी ३३ लाख २ हजार रुपये, खेड तालुक्यातील १ हजार ९४७ शेतकऱ्यांना २ कोटी २ लाख २३ हजार रुपये, आंबेगाव तालुक्यातील ९ हजार ७७९ शेतकऱ्यांना ४ कोटी ९६ लाख ६९ हजार रुपये, जुन्नर तालुक्यातील २२ हजार ५९१ शेतकऱ्यांना २४ कोटी ५१ लाख ४६ हजार रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

शिरूर तालुक्यातील ४ हजार ७३४ शेतकऱ्यांना ४ कोटी ५६ लाख ६६ हजार रुपये, पुरंदर तालुक्यातील २७ हजार ८४१ शेतकऱ्यांना २१ कोटी २६ लाख ५७ हजार रुपये, दौंड तालुक्यातील २ हजार ८ शेतकऱ्यांना २ कोटी १४ लाख ८० हजार रुपये, बारामती तालुक्यातील ८ हजार ४१७ शेतकऱ्यांना ५ कोटी ५२ लाख २० हजार रुपयांची नुकसान भरपाई मंजूर झाली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

याशिवाय जून ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत नैसर्गिक आपत्ती व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शेती पिकाच्या नुकसानीसाठी ३ कोटी १४ लाख २१ हजार रुपये आणि शेतजमीन खरडून झालेल्या नुकसानीपोटी १३ लाख ६४ हजार रुपयांची नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

### अनुदानाची मागणी करण्यात आली

**दरम्यान, यंदाच्या मार्च महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे ८४ गावांतील १ हजार ४३४ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील ४०८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यासाठी ७० लाख ७० हजार रुपयांचे अनुदानाची मागणी करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

# पुण्यात पुन्हा पोटनिवडणूक होणार की गिरीश बापटांची जागा रिक्त राहणार?

## उमेदवारी नेमकी कोणाला मिळेल? या सध्या शहरात चर्चा सुरू आहे.

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचे पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार गिरीश बापट यांचे निधन झालं. त्यामुळे आता त्यांच्या रिक्त जागेवर पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. मागील महिन्यात कसब्याची पोटनिवडणूक राज्यभर गाजली आणि आता पुन्हा पोटनिवडणूक होणार का? आणि झाली तर नेमकी कोणाला उमेदवारी मिळेल? याच्या सध्या शहरात चर्चा सुरु आहे. मात्र या पोटनिवडणुकीबाबत कायदे तज्ज्ञांचे काय मत आहे आणि जेष्ठ पत्रकार यांना नेमकं काय वाटतं... पाहूयात!**

कायदे तज्ञ उल्हास बापट सांगतात की, खासदार गिरीश बापट यांचे निधनंतर रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. वर्षभरानंतर पुढच्या निवडणुका आहेत. त्यामुळे कायद्यानुसार ही पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. 1951 सालचा 151 A लोकप्रतिनिधी कायद्यानुसार जर एक वर्षाची मुदत राहिली असेल तर निवडणूक घ्यावी लागते. लोकसभा निवडणूक 2024 मे एप्रिल मध्ये होत आहे. आत्ता मार्च चालू असल्यामुळे एक वर्षावरुन अधिक काळ आहे. त्यामुळे ही निवडणूक घ्यावी लागेल आणि ही निवडणूक 6 महिन्याच्या आत घ्यावी लागते. विधानसभेची निवडणुकीसारखीच लोकसभेची ही निवडणूक होईल, असंही ते म्हणाले.



ज्येष्ठ पत्रकार अद्वैत मेहता म्हणाले की, कोणत्याही कारणामुळे जागा रिक्त झाली तर त्या जागेवर सहा महिन्यांच्या आत पोटनिवडणूक घ्यावी लागते. त्याचप्रमाणे गिरीश बापट यांच्या जागीदेखील पोटनिवडणूक जाहीर होईल. ही पोटनिवडणूक जाहीर झाली तर विधानसभेच्या पोटनिवडणुकीप्रमाणेच भाजप आणि महाविकास आघाडीसाठी प्रतिष्ठेची असेल. भाजपकडून ही निवडणूक टाळण्याचा प्रयत्न होणार नाही मात्र बिनविरोध करण्याचा प्रयत्न भाजपकडून मोठ्या प्रमाणात केला जाऊ शकतो. भाजप कायम निवडणुकीसाठी तयार असतात. खासदारकीची निवडणूक असल्यामुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा हे देखील या निवडणुकीत लक्ष घालतील.

**...तर बिनविरोध होण्याची शक्यता!**

अधिक काळ गिरीश बापटांची जागा रिक्त राहणार असेल तर निवडणुका घेणं बंधनकारक आहे. या पोटनिवडणूक जाहीर झाल्या तर बापटांच्या कुटुंबियांमधील सदस्याला उमेदवारी दिली जाऊ शकते. मुलगा गौरव बापट आणि सून स्वरदा बापट या दोघांना उमेदवारी मिळू शकते मात्र गौरव हे राजकारणात फार सक्रिय नाहीत त्यामुळे स्वरदा यांच्या नावाचा विचार केला जाऊ शकतो.

### उमेदवार निवडण्याचं आव्हान...

**गिरीश बापट यांच्या रिक्त झालेल्या जागेवर निवडणुका झाल्या तर भाजप आणि महाविकास आघाडी समोर उमेदवाराची निवड हे मोठं आव्हान असणार आहे. विधानसभेच्यावेळी देखील दोन्ही पक्षासमोर उमेदवार निवडीचं आव्हान होतं. त्यानंतर भाजपने उमेदवार जाहीर केल्यानंतर कॉंग्रेसकडून किंवा महाविकास आघाडीकडून उमेदवार जाहीर करण्यात आला. विरोधकांचा उमेदवार पाहून पक्षाने रणनिती आखली होती. मात्र जोपर्यंत उमेदवार निश्चित होत नाही तोपर्यंत राजकीय हालचाली संथगतीने सुरु होत्या. त्याच प्रमाणे यावेळीदेखील चित्र बघायला मिळू शकतं. त्यात भाजपकडून काही नावांची चर्चा सुरु झाली आहे आणि ही जागा कॉंग्रेसची असल्यामुळे कॉंग्रेस आणि महाविकास आघाडीकडूनदेखील काही नावांची चर्चा आहे. त्यामुळे आता कोणत्या पक्षाकडून नेमका कोणता उमेदवार दिला जातो त्यात जात आणि धर्मानुसार उमेदवार ठरु शकतो का?, हे पाहणं महत्वाचं असेल.**

# 'मोदी हटवा, देश वाचवा'चा नारा!

## दडपशाहीचा विरोध : 'आप'ने लावले शहरभर बॅनर

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी: शहरात ठिकठिकाणी 'मोदी हटवा, देश वाचवा' या आशयाचे बॅनर सकाळी पाहायला मिळाले. हे बॅनर कोणी लावले याबाबत शहरभर चर्चा सुरू झाली असतानाच आम आदमी पार्टीने आंदोलन घेऊन 'मोदी हटाव, देश बचाव' ही मोहीम शहरात सुरू केली असल्याचे जाहीर केले.




ज्याप्रमाणे इंग्रजांनी देशातील नागरिकांवर दडपशाही केली, त्याच पद्धतीची दडपशाही मोदी सरकार करत आहे. हिंडनबर्ग रिपोर्टने अदानी समूहाचा घोटाळा उघडकीस आणला. एल आय सी, एस बी आय या सरकारी संस्थांची, तसेच सामान्य नागरिकांची गुंतवणूक यामुळे धोक्यात आल्याने त्यावर संयुक्त संसदीय समितीने चौकशी करावी अशी मागणी विरोधकांनी संसदेत लावून धरली.

परंतु गेले दोन आठवडे खुद्द सरकारी पक्षाने संसदेत गदारोळ घालून अदानी सारख्या भांडवलदारांना वाचवण्याचा प्रयत्न मोदी सरकारने केला. गेल्या नऊ वर्षातील मोदी सरकारच्या कारकिर्दीत काही मोजक्या भांडवलदारांची 8 लाख कोटींची कर्जे माफ करण्यात आली आहेत.

शेतकऱ्यांच्या रेट्यामुळे केंद्र सरकारला कृषी कायदे मागे घ्यावे लागले होते, परंतु शेतमालाला किमान आधारभूत किंमत देण्याबाबत एका वर्षात निर्णय घेऊ असे आश्वासन देऊन देखील मोदी सरकारला त्याबाबत निर्णय घेता आलेला नाही.




### देशभरातून मोहीमेला पाठिंबा...

ईडी-सीबीआय या केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करून विरोधकांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशभरात अनेक पत्रकारांवर राष्ट्रीय सुरक्षा कायदा यासारख्या कायद्यांचा गैरवापर करून तुरुंगात टाकले जात आहे. महागाई, बेरोजगारीने सामान्य नागरिकांचे जगणे मुश्कील झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर मोदी सरकारला केंद्राच्या सत्तेतून पायउतार केल्याखेरीज पर्याय उरलेला नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीने देशभरात 'मोदी हटाव, देश बचाव' ही मोहीम देशभर सुरू केली आहे. शहरात लागलेले बॅनर आम आदमी पार्टीने लावले आहेत. ही मोहीम म्हणजे केंद्र सरकारच्या दडपशाही विरोधात फुंकलेले रणशिंग आहे. देशाला आता शिकलेला पंतप्रधान अपेक्षित आहे. या मोहिमेला देशभरातुन पाठिंबा मिळत आहे. ही मोहीम सुरूच राहणार असून शहरभरात आणखी बॅनर-पोस्टर लावले जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# 'प्रबोधन पर्वा'साठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देश : फुले, आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून दि.११ ते १५ एप्रिल २०२३ दरम्यान विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने आवश्यक सर्व सेवा सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका आणि पोलीस प्रशासनाला दिले.



क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वानिमित्त आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत महापालिका आणि पोलीस प्रशासन यांची आढावा बैठक संपन्न झाली,

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, शहर अभियंता मकरंद निकम, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पवन साळवे, सह शहर अभियंता संजय खाबडे, प्रमोद ओंभासे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील, उप आयुक्त सुभाष इंगळे, रविकिरण घोडके, कार्यकारी अभियंता थॉमस नरोन्हा, शशिकांत मोरे, नितीन देशमुख, दिलीप धुमाळ, क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, सुचिता पानसरे, विजयकुमार थोरात, विशेष अधिकारी किरण गायकवाड, उप अभियंता विजय कांबळे, चंद्रकांत कुंभार, अशोक कुटे, लक्ष्मीकांत कोल्हे, बाणाईचे प्रकाश दामोदरे, पोलीस निरीक्षक शंकर अवताडे, भोजराज मिसाळ, अर्जुन पवार, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे आदी उपस्थित होते. पोलिसांच्या वतीने बैठकीत विविध सूचना मांडण्यात आल्या. बैठकीचे प्रास्ताविक उपायुक्त रविकिरण घोडके यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी केले.

### आवश्यक सुविधा पुरविण्याची तयारी...

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, विचार प्रबोधन पर्वामध्ये महापालिका दरवर्षी विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करत असते. यावर्षी देखील असे कार्यक्रम होणार आहेत. सर्व कार्यक्रम आनंदाच्या वातावरणात आणि व्यवस्थित पार पाडण्यासाठी महापालिका चांगले नियोजन करणार आहे. शहरात मोठ्या उत्साहात जयंती साजरी होत असते. त्यादृष्टीने महापालिकेने सर्व आवश्यक सुविधा नागरिकांना उपलब्ध करून द्याव्यात. मिरवणूक मार्गावर महापालिकेचे चालू असलेले काम वेळेत पूर्ण करावेत. विशेषतः पिंपरी येथील उड्डाण पुलाचे काम आणि वाकड येथील रस्त्यांचे काम यावर लक्ष केंद्रित करावे. पिंपरी आणि दापोडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात दरवर्षी नागरिकांसाठी पालिकेकडून आवश्यक सुविधा पुरवल्या जातात. येथे सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस आणि महापालिका प्रशासनाने समन्वयाने नियोजन करावे. रोजगार मेळावा, रक्तदान शिबीर यासह अनेक कार्यक्रमांचे आयोजन तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमेरे, शौचालयाची व्यवस्था, विद्युत व्यवस्था, मंडप व्यवस्था आदी बाबींची पूर्तता संबंधित विभागाने वेळेत पूर्ण कराव्यात, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी दिल्या.

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वानिमित्त आज महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या उपस्थितीत महापालिका आणि पोलीस प्रशासन यांची आढावा बैठक संपन्न झाली.

## संपादकीय »

### पर्यावरणपूरक जीवनशैली हेच उत्तर

***हवामानबदलाचे संकट घोंगावत आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्तींची वारंवारिता आणि तीव्रता वाढत आहे. त्यावर मात करण्यासाठी पर्यावरणपूरक उपाययोजनांची जीवनशैली अंगीकारणे गरजेचे आहे; परंतु धोरणकर्ते याकडे लक्ष द्यायला तयार नाहीत.***

जागतिक इतिहासात दोन ठळक बाबींसाठी १९७२ हे वर्ष नोंदले गेले. एक, त्यावर्षी 'क्लब ऑफ रोम' या संघटनेचा 'लिमिट्स टू ग्रोथ' हा बहुचर्चित अहवाल आला. दोन, स्टॉकहोम येथे आयोजित पहिली जागतिक पर्यावरण परिषद. या दोन परस्परविरोधी घटनांमुळे पर्यावरणाचा प्रश्न जागतिक ऐरणीवर आला. वाढवृद्धीला मर्यादा आहेत. एक तर खनिज इंधने तसेच इतर संसाधने मर्यादित आहेत.

एवढेच नाही तर जीवाश्म इंधनाचा वापर, औद्योगिक व रासायनिक प्रक्रियांमुळे जे कर्ब आणि अन्य विषारी वायूंचे उत्सर्जन होते त्याला सामावून घेण्यासाठी शोषणार्थ अवकाशही (सिंक) मर्यादितच आहे. सबब, अविरत वाढवृद्धी शक्य नाही. मुख्य म्हणजे औद्योगिक क्रांतीनंतर हरितगृह वायूमुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. कार्बन डायऑक्साइडचे हवेतील प्रमाण जे औद्यागिक क्रांतीपूर्व काळात दर दशलक्ष घटकात २८०होते, ते आज दीडपट म्हणजे ४२०झाले आहे. तापमानवाढ १.१ अंश सेल्सियस ही वाढ दीड अंशावर रोखली नाही तर निसर्गाचे संतुलन अधिक ढासळेल. पृथ्वीवरील चक्रीय प्रक्रिया ऋतुचक्र वातावरणीय स्थैर्य, मानवाचे भरणपोषण व योगक्षेम धोक्यात येईल.

'इंटरनॅशनल पॅनल ऑन क्लायमेट चेंज'ची (आयपीसीसी) १९८८मध्ये स्थापना झाली. जगभरच्या विख्यात वैज्ञानिकांचा समावेश असलेल्या या संस्थेने गत ३५वर्षांत पर्यावरणाचे सहा स्थितिदर्शक अहवाल जारी केले. अभ्यासक, संशोधक आणि धोरणकर्त्यांसाठी ते हवामानविषयक शास्त्रीय तर्क व तथ्यांचे अद्ययावत ज्ञानभांडार आहे. २० मार्च २०२३रोजी 'आयपीसीसी'ने स्वित्झर्लंड येथे आजवरच्या सर्व शास्त्रीय संशोधन अहवालांचा धोरणकर्त्यांसाठी साररूप (सिंथिसीस) अहवाल प्रसिद्ध केला. त्यावेळी संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अ‍ॅन्तोनिओ गुटेरेस यांनी 'खनिजइंधन क्षेत्रातील गुंतवणूक पूर्णत: थांबवावी. त्याचा वापर लक्षणीयरित्या कमी करावा.

अहवालात अधोरेखित केल्यानुसार २०३०मध्ये कर्बोत्सर्ग २०१९च्या पातळीपेक्षा निम्मा करून २०५०मध्ये नेटझिरोचे उद्दिष्ट गाठले पाहिजे. तरच १.५ अंश सेल्सियसची सीमा राखता येईल,' असे सांगितले. मात्र जगभरचे वैज्ञानिक, तत्त्ववेत्ते पर्यावरण प्रश्नाकडे सातत्याने लक्ष वेधत असले तरी धोरणकर्ते मात्र पर्यावरण म्हणजे विकासाला अवरोध, आंधळाविरोध संबोधत त्यांची आंधळी वाढवृद्धी करण्यात मश्गुल होते.

# शासनाने खासगी अनुदानित शाळा चालवू नयेत, कारण...






नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या अधिवेशनात खासगी शाळांच्या वेतनेतर अनुदानाबद्दलच्या प्रश्नावरील चर्चेच्या वेळी शालेय शिक्षणमंत्र्यांनी शैक्षणिक संस्थांना हा खर्च करणे झेपत नसेल तर शासन खासगी अनुदानित शाळा ताब्यात घेईल, असे उत्तर दिले होते. शालेय शिक्षणमंत्र्यांच्या या घोषणेचे पडसाद प्रसारमाध्यमांत आणि शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर उमटले. शैक्षणिक संस्थाचालकांच्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाचा निषेध करणारे निवेदनही प्रसिद्ध केले.

पूर्वी खासगी संस्थांनी चालवलेल्या अनुदानित शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान भौतिक सुविधा, वीज आणि इतर बाबींवरील खर्च भागवण्यासाठी पुरेसा असायचा. पण २०१३ पासून त्यात प्रचंड प्रमाणात कपात करण्यात आली आहे. हे तुटपुंजे अनुदानसुद्धा नियमितपणे मिळत नाही. खासगी अनुदानित शाळांच्या वेतनेतर अनुदानावरील खर्च शासनाला झेपणारा नसल्यामुळे त्यासाठी शासनावर अवलंबून राहू नये, ही जाणीव करून देणे एवढाच शिक्षणमंत्र्यांनी केलेल्या घोषणेमागील उद्देश असावा. मात्र ही घोषणा बहुतेकांना धक्कादायक वाटली हे मात्र खरे. यानिमित्ताने शासनाची शिक्षण क्षेत्रात नक्की भूमिका काय असावी याबाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांवर व्यापक स्वरूपाची चर्चा होणे आवश्यक आहे. या दृष्टीने काही मुद्द्यांचा धावता आढावा घेण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे.

भारतातील शाळांचे सरकारी शाळा, खासगी संस्थांनी चालवलेल्या अनुदानित शाळा आणि विनाअनुदानित शाळा असे तीन प्रमुख प्रकार आहेत. सरकारी, खासगी अनुदानित आणि खासगी विनाअनुदानित शाळांचे महाराष्ट्रातील शेकडा प्रमाण अनुक्रमे ६०, २२ आणि १८ एवढे, तर राष्ट्रीय पातळीवर हेच प्रमाण अनुक्रमे ७०, ५ आणि २५ एवढे आहे. भारतातील बहुतेक सरकारी शाळा थेट त्या त्या राज्यांची सरकारे चालवतात. महाराष्ट्रात मात्र बहुतेक सरकारी शाळा जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि नगर परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत चालवल्या जातात. महाराष्ट्रात बहुतेक सरकारी शाळा या प्राथमिक शाळाच आहेत.

सुमारे ६० टक्के सरकारी शाळांमध्ये राज्यातील केवळ २६ टक्के विद्यार्थी शिकतात. ग्रामीण भागांत छोट्या शाळांची समस्या मोठी आहे. सुमारे ३८ हजार जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दोन शिक्षकी आहेत. सुमारे १३ हजार शाळांचा पट २० पेक्षा कमी आहे. आर्थिकदृष्ट्या परवडणाऱ्या नसल्यामुळे या शाळा बंद करण्याचे प्रयत्न गेल्या १० वर्षांत अनेकदा झाले. परंतु असे केल्यामुळे मोठ्या संख्येने मुले शालाबाह्य होतील, अशी ओरड झाल्यामुळे हे प्रयत्न फारसे यशस्वी ठरले नाहीत. 'ड' वर्ग महानगरपालिकांच्या शाळांचे आणि शिक्षकांचे प्रश्नही गंभीर आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शिक्षकांना मोठ्या प्रमाणावर शिक्षणेतर कामे दिली जातात.

सरकारी शाळांमधील शिक्षक, मुख्याध्यापक आणि केंद्रप्रमुख यांच्या जागा मोठ्या प्रमाणावर रिकाम्या आहेत. या शाळांचा दर्जा उंचवावा, यासाठी आवश्यक राजकीय इच्छाशक्तीचा अभाव दिसतो. काही अपवाद वगळता बहुतेक लोकप्रतिनिधींच्या स्वत:च्या खासगी शाळा असल्यामुळे सरकारी शाळांकडे पाहण्याची त्यांची दृष्टी फारशी प्रोत्साहन देणारी नसते. शासनाच्या स्तरावरसुद्धा या शाळांच्या वाट्याला उपेक्षाच येते. या शाळांनासुद्धा वेतनेतर बाबींवरील खर्चासाठी अतिशय तुटपुंजा निधी मिळतो.

# ध्येय आणि उद्दिष्ट!

**आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावर ध्येये आणि उद्दिष्टे ठरविणे आणि ते साध्य करणे हे वैयक्तिक; तसेच व्यावसायिक प्रगतीकरिता अतिशय आवश्यक आहे.**

भविष्यात नक्की काय करायचे त्याला एक दिशा मिळते. ध्येयांना मूर्तस्वरूप देण्याचा मार्ग विकसित होऊ लागतो. आपली ध्येये आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक ती सर्व तंत्रे, कौशल्ये आपण शिकू लागतो. प्रत्येक कामागिरी चोखपणे पार पाडण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. प्रत्येक घटनेची जबाबदारी स्वतःवर घेत गेल्याने व्यक्तिमत्त्व दिवसेंदिवस सक्षम होत जाते.



आपण या पूर्वीच्या लेखांमध्ये आत्मपरीक्षण SWOT च्या माध्यमातून करायला शिकलो. याचा उपयोग आता GOAL SETTING मध्ये करायचा आहे. आपली बलस्थाने ओळखून STRENGTHS नुसार ध्येये ठरवता येतात, तर न्यूनतांचा विचार केल्यामुळे नवीन तंत्रे व कौशल्ये शिकण्यास सुरवात झालेली असेल. चला तर बघूया, ध्येये आणि उद्दिष्टे कशी लिहावीत!

1) ध्येये व उद्दिष्टांची निवड : स्वतःची आवड, आर्थिक कुवत; तसेच आत्तापर्यंत अवगत झालेले ज्ञान तथा एखाद्या क्षेत्रातील अनुभव लक्षात घेऊन ध्येये आणि उद्दिष्टांची निवड करता येईल. येथे स्वतःतील बलस्थानांचा आढावा घ्या.

2) पंचवार्षिक योजना : व्यवस्थापकीय दृष्टिकोनातून प्रत्येक ध्येय किमान पाच वर्षांकरिता लिहिले जाते. मला पाचव्या वर्षी काय साध्य करायचे याचा विचार उतरत्या क्रमाने केला जातो. उदाहरणार्थ, वर्ष २०२३ ते २०२८ मध्ये मी पाचव्या वर्षी व्यवसाय सुरू करू इच्छितो. त्याकरिता येत्या पाच वर्षांचे नियोजन. २०२८ मध्ये व्यवसाय सुरू, तर २०२५ मध्ये माझे एमबीए पूर्ण होणे गरजेचे आहे. त्याकरिता २०२३ मधे पूर्वपरीक्षा पास करणे. या पाच वर्षांत अनेक GOALS ना अल्पकालीन, मध्यमकालीन; तसेच दीर्घकालीनमध्ये विभागून त्यावर काम करावे लागेल.

3) SMART : आपल्या ध्येये आणि उद्दिष्टांना तोलूनमापून घेण्याची पद्धत. ध्येय अल्पकालीन असो, वा दीर्घकालिन त्याला SMARTच्या पट्टीवर पडताळून बघा. माझी नैसर्गिक क्षमता (APTITUDE) समजून घेणे. त्यातून आपल्या ध्येयाचे मोजमाप करणे म्हणजे सतत त्याचा आढावा घेणे. उदा. MBA प्रथम वर्ष सर्वांना सारखेच विषय असतात; पण SPECIALIZATION कडे वळताना जरी HR घ्यायचे ठरवले होते, तरी मला जर कायद्याचा अभ्यास करणे कंटाळवाणे वाटत असेल, तर मार्केटिंग घेतलेले बरे, हे कळणे!

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यात आता 'रामनवमी पॅटर्न' सुरू!

## दंगलींच्या घटनांवरून संजय राऊत यांचे भाजपा-शिंदे गटावर टीकास्त्र!

। संभाजीनगर।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



छत्रपती संभाजीनगरमध्ये रामनवमीच्या दिवशी झालेल्या जाळपोळ आणि दगडफेकीच्या घटनेमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. भारतीय जनता पार्टी, एआयएमआयएम, शिवसेना (ठाकरे गट) पक्षांचे नेते एकमेकांवर आरोप करत आहेत. दरम्यान, याप्रकरणावरून संजय राऊतांनी शिंदे फडणवीस सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे. तसेच राज्यात दंगलींचा रामनवमी पॅटर्न निर्माण केला जातो आहे, असा आरोपही त्यांनी केला. एपीबी माझा या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली

रामनवमीच्या निमित्ताने गेल्या दोन वर्षांत दंगलींचा पॅर्टन निर्माण केला जातो आहे. हा 'रामनवमी पॅटर्न' आहे. राज्यात अनेक ठिकाणी गुढीपाडव्यालाही शोभायात्रा निघाल्या. गुडीपाडव्यापासून हिंदूंचं नवीन वर्ष सुरू होतं. गुढीपाडव्याच्या शोभायात्रा मुस्लीम वस्तीतून निघाल्या होत्या. मात्र, तेव्हा दंगली झाल्या नाहीत. पण रामनवमीला जाणीवपूर्वक दंगली घडवल्या गेल्यात, असा गंभीर आरोप संजय राऊत यांनी केला.

संभाजीनगरचं नामांतर शांततेत झालं. महाविकास आघाडी सरकारने या नामांतराचा प्रस्ताव मंत्रीमंडळात मंजूर केला होता, तेव्हा कोणतीही दंगल झाली नाही. काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने हा प्रस्ताव मंजूर केला, तेव्हाही दंगली झाल्या नाहीत. अनेकांनी नामांतराला लोकशाही मार्गाने विरोधात केला, पण कुठंही दंगली घडवल्या नाहीत. मग अचानक रामनवमीलाच कशी दंगली झाल्यात? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

### रामनवमीलाच कशी दंगली झाल्यात?

» संभाजीनगरचं नामांतर शांततेत झालं. महाविकास आघाडी सरकारने या नामांतराचा प्रस्ताव मंत्रीमंडळात मंजूर केला होता, तेव्हा कोणतीही दंगल झाली नाही. काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने हा प्रस्ताव मंजूर केला, तेव्हाही दंगली झाल्या नाहीत. अनेकांनी नामांतराला लोकशाही मार्गाने विरोधात केला, पण कुठंही दंगली घडवल्या नाहीत. मग अचानक रामनवमीलाच कशी दंगली झाल्यात? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

## न्यायालयाने निधीवरून शिंदे-फडणवीस सरकारला फटकारले

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



सत्ता काबीज केल्यापासून स्व:पक्षांची आमदार, मंत्री यांना हवा तेवढा आणि हवा तेव्हा निधी देणाऱ्या शिंदे-फडणवीस सरकारला वळणावर आणण्याची भूमिका न्यायालयाने घेतली आहे.

सरकारने आतापर्यंतचा घाई गडबडीत निधी वाटप केल्याकडे बोट ठेवून त्याचा तपशील मागवण्यापासून नव्या आर्थिक वर्षांतील निधीचे वाटप स्थगित करण्याचा आदेश न्यायालयाने गुरुवारी (ता. ३०) दिला आहे. त्यामुळे २०२३-२४ या वर्षासाठी सरकारला निधी वाटता येणार नसल्याचे स्पष्ट आहे.

राज्यात शिंदे-फडणवीस यांचे सरकार सत्तेवर आल्यापासून स्वपक्षाचे आमदार, मंत्र्यांना मोठ्या प्रमाणात निधी देण्यात येत आहे. त्यातच सरकार कोसळण्याच्या शक्यतेने अशा प्रकारे फायली मंजूर करण्यासोबतच निधी दिला जात असल्याचा आरोप विरोधकांनी सरकारवर केला होता.

दुसरीकडे, विरोधी आमदारांची कामे थांबविण्यासोबतच त्यांना कामांसाठी पुरेसा निधी मिळत नसल्याचीही ओरड आहे. या मुद्यांवरून सत्ताधारी-विरोधकांत अनेकदा आरोप-प्रत्यारोप झाले आहेत.

### निधी वाटपासाठी घाई कशासाठी?

» निधी वाटपाबाबतच्या याचिका प्रलंबित असताना सरकारने १०० टक्के निधी वाटपासाठी घाई का केली, असा प्रश्न करीत काही गडबड असल्याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. आमदारांना दिलेल्या निधीत तफावत आहे, ती का दिसते आहे, याची विचारणाही न्यायालयाने केली आहे. तसेच, सुनावणीतून पुढे आलेल्या साऱ्या मुद्यांवर प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण देण्याचा आदेशही न्यायालयाने शिंदे-फडणवीस सरकारला दिला आहे. त्यामुळे गेल्या साडेआठ-नऊ महिन्यांत हात मोकळा ठेवून निधी वाटलेल्या या सरकारपुढे नव्या अडचणी निर्माण झाल्या आहेत.

## "...तर हे सरकार महिलांबाबत असंवेदनशील ठरेल",

## सुप्रिया सुळेंनी टोचले शिंदे-फडणवीस सरकारचे कान



। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

सुषमा अंधारे सगळ्यांनाच माझा भाऊ म्हणतात, पण त्या बाईने काय-काय लफडी केली आहेत, तिलाच माहिती, अशी टीका शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सभेत बोलताना केली होती. त्यांच्या या विधानानंतर विविध स्तरावरून प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान, यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शिंदे-फडणवीस सरकारचे कान टोचले. तसेच शिरसाट हे सरकारी पक्षाचे आमदार आहेत म्हणून त्यांना पाठीशी घालण्याचं काम सुरू आहे का? असा सवाल त्यांनी शिंदे सरकारला विचारला आहे. ट्वीट करत त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली."छत्रपती संभाजीनगर येथील आमदार संजय शिरसाट यांनी दोन-तीन दिवसांपूर्वी सुषमा अंधारे यांच्याबाबत बोलताना उधळलेली मुक्ताफळे ही समस्त महिला वर्गाला अपमानित करणारी आहेत. राजकारण असो किंवा समाजकारण, शीर्षस्थानी काम करणाऱ्या महिलांच्या संदर्भाने जर अशी आक्षेपार्ह आणि अवहेलनात्मक वक्तव्य येत असतील, तर अगदी तळागाळापर्यंत काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेचे काय हा प्रश्न अधिक दाहक बनतो", अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

### "...म्हणून त्यांना पाठीशी घालत आहे का?"

» "बेताल वक्तव्य करणारी व्यक्ती कुणी सर्वसामान्य नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरा असणाऱ्या विधिमंडळातील सदस्य असेल, तर राज्याचे पालक म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष घालणे अधिक गरजेचे आहे. संबंधित लोकप्रतिनिधी हे सरकारी पक्षाचे आहेत म्हणून सरकार त्यांना पाठीशी घालत आहे का? त्यांच्यावर अद्यापही गुन्हा दाखल झालेला नाही हे अतिशय खेदजनक आहे", असेही त्या म्हणाल्या.

### शिरसाटांविरोधात कारवाईची मागणी

» "आक्षेपार्ह वक्तव्ये, विनयभंग किंवा सायबर क्राईम असो महिलांच्या संबंधातील तक्रारींवर तातडीने कारवाई करणे अतिशय गरजेचे आहे. अन्यथा हे सरकार महिलांबाबत असंवेदनशील असल्याचा संदेश जाईल. तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची तत्काळ दखल घेऊन कारवाई करावी", अशी मागणीही त्यांनी केली.

## बेस्ट खरेदी करणार ५० मेगावॉट वीज; लोकेश चंद्र




**मुंबई** : एप्रिल मे या दोन उन्हाळ्याच्या महिन्यांत विजेचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी बेस्ट उपक्रमाने ५० मेगावॉट वीज खरेदीचा निर्णय घेतल्याची माहिती बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांनी दिली. बेस्टचे मुंबईत १० लाख ४७ हजार वीज ग्राहक आहेत. उन्हाळ्यात विजेच्या मागणीत वाढ होते, यामुळे पुढील १ एप्रिल ते जूनपर्यंत असे तीन महिन्यांसाठी अतिरिक्त0 वीज खरेदीचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे.

# सम्राट अशोक कुणाचे?

## ओबीसी समूहाची मते मिळवण्यासाठी भाजपा – जेडीयूमध्ये रस्सीखेच, अमित शहांच्या दौऱ्याकडे लक्ष

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

**बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भाजपाला बाजूला सारून आरजेडी सोबत घरोबा केला आणि बिहारच्या राजकारणात भूकंप झाला. २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक आणि २०२५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. या दोन्ही निवडणुका डोळ्यासमोर ठेवून भाजपाने बिहारमध्ये लक्ष घातले आहे. सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त नितीश कुमार यांनी केलेल्या वक्तव्यामुळे भाजपा आणि जेडीयू यांचे ओबीसी मतांच्या ध्रुवीकरणासाठी राजकारण सुरू असल्याचे समोर येते. सम्राट अशोक यांच्या जयंतीचे हे २,३२८ वे वर्ष आहे. यानिमित्त अशोक यांची जात कोणती? कोणते जातसमूह त्यांच्यावर आपला हक्का सांगतात, यावरून बिहारमध्ये वाद सूरू झाले आहेत.**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे २ एप्रिल रोजी बिहारच्या दौऱ्यावर येत आहेत. राज्यातील सत्ता गेल्यापासून अमित शहा यांनी अनेकदा बिहारचा दौरा केला. शहांच्या दौऱ्यावर नितीश कुमार यांनी फिरकी घेतली. सम्राट अशोक यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात पटना येथे नितीश कुमार म्हणाले, "पुढील काही दिवसांत दिल्लीवरून नेते येतील. सम्राट अशोक यांच्याबाबत चुकीची माहिती देऊन तुमची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतील. स्वतः च्या राजकीय फायद्यासाठी ते समाजा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतील."जनता दल (युनायटेड) पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार स्वतःला केंद्रात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न काही काळापासून करत आहेत. यासाठी त्यांनी भाजपासोबत काडीमोड घेत जुना सहकारी आरजेडीसोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेतला. एकेकाळी भाजपासोबत सत्ता भोगणारे नितीश कुमार आता भाजपावर तुटून पडताना



### आरजेडीसोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय

**» "जनता दल (युनायटेड) पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार स्वतःला केंद्रात प्रस्थापित करण्याचा प्रयत्न काही काळापासून करत आहेत. यासाठी त्यांनी भाजपासोबत काडीमोड घेत जुना सहकारी आरजेडीसोबत सत्ता स्थापन करण्याचा निर्णय घेतला. एकेकाळी भाजपासोबत सत्ता भोगणारे नितीश कुमार आता भाजपावर तुटून पडताना दिसतात. पटना येथील कार्यक्रमात ते पुढे म्हणाले की, या लोकांनी (भाजपा) स्वातंत्र्याच्या आंदोलनात कधीही सहभाग घेतला नव्हता. आता सम्राट अशोक यांचे नाव घेऊन ते काही जातींना वेगळे करण्याचा प्रयत्न करतील. मी कधीही जातीवरून लोकांना विभागण्याचे काम केले नाही.**

दिसतात. पटना येथील कार्यक्रमात ते पुढे म्हणाले की, या लोकांनी (भाजपा) स्वातंत्र्याच्या आंदोलनात कधीही सहभाग घेतला नव्हता. आता सम्राट अशोक यांचे नाव घेऊन ते काही जातींना वेगळे करण्याचा प्रयत्न करतील. मी कधीही जातीवरून लोकांना विभागण्याचे काम केले नाही.

चंद्रगुप्त मौर्य यांचा नातू असलेल्या अशोक यांचे भारतीय इतिहासात अनन्यसाधारण असे स्थान आहे. इसवी सन पूर्व २६८ आणि २३२ दरम्यान अशोक यांचे राज्य असल्याचे मानले जाते. सम्राट अशोक यांचे राजकीय मूल्य ओळखणारा भाजपा हा पहिलाच पक्ष आहे. भाजपाने २०१५ साली सम्राट अशोक यांच्या २,३२० व्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारच्यावतीने पोस्टल स्टँपचे अनावरण केले होते. त्यानंतर बिहार मधील काही जातींनी सम्राट अशोक यांच्यावर हक्क सांगण्यास सुरुवात केली. यामध्ये विशेष करून ओबीसी प्रवर्गातील कुशवाहा जात सर्वात पुढे होती. आम्ही सम्राट अशोकाचे वशंज आहोत, असे कुशवाहांचे मानने आहे. तसेच द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना बिहार मधील एका मोठ्या नेत्याने सांगितले की, सम्राट अशोक हा बिहारमधील ओबीसी वर्गाचे प्रेरणास्थान आहे. अशोकाकडे पाहून त्यांना प्रेरणा मिळते.जानेवारी २०२२ मध्ये, अशोक यांच्याबाबत एक वाद उफाळून आला होता. माजी सनदी अधिकारी, भाजपाचे पदाधिकारी आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेते, नाटककार दया प्रकाश सिन्हा यांनी अशोक बाबत एक वादग्रस्त वक्तव्य केले. नवभारत टाइम्स या वृत्तपत्राशी बोलताना सिन्हा म्हणाले, "सम्राट अशोक या नाटकासाठी मी संशोधन करत असताना माझ्या लक्षात आले की, सम्राट अशोक आणि मुघल औरंगजेब यांच्यात साम्य होते. दोघांनीही सुरुवातीच्या कालखंडात दुष्कृत्य केले. त्यानंतर त्या कृत्यावर पडदा टाकण्यासाठी धर्माचा आधार घेतला.

# कर्नाटकमध्ये भाजपाची रणनिति

## नड्डांनी बोलाविली सरचिटणीसांची बैठक

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसच्या तयारीला आक्रमक प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपने राजकीय धोरणांमध्ये बदलाची तयारी केली आहे. यासाठी भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी ४ एप्रिलला सरचिटणीसांची बैठक बोलावली आहे.**

कर्नाटकमध्ये भ्रष्टाचार, सत्ताविरोधी वातावरण यासारख्या मुद्द्यांवर भाजपला घेरण्याच्या प्रयत्नात असलेल्या काँग्रेसने आता राहुल गांधींच्या अपात्रतेनंतर सहानुभूती मिळविण्यासाठीची रणनीती आखली आहे.

त्यामुळे भाजपने आपल्या रणनितीमध्ये बदलाची तयारी चालविली असून त्यासाठीची ही बैठक होणार आहे. कर्नाटकचे प्रभारी सरचिटणीस अरुण सिंह यांच्यासोबतच पक्षाचे कर्नाटक निवडणूक प्रभारी असलेले केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, सहप्रभारी मनसुख मंडाविया आणि कर्नाटकची विशेष जबाबदारी देण्यात आलेले तामिळनाडूचे प्रदेशाध्यक्ष अन्नामलाई हे उपस्थित



### अद्याप भाजपची यादी जाहीर नाही

**» कर्नाटकमध्ये होणारे राजकीय आरोप प्रत्यारोप हे बेरोजगारी, भ्रष्टाचार यासारख्या मुद्द्यांबरोबरच धार्मिक ध्रुवीकरणाच्या भोवती फिरणारे आहेत. काँग्रेसने १२४ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार त्याच प्रमाणे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचे पुत्र प्रियांक खर्गे यांना मैदानात उतरविले आहे. मात्र, भाजपने अद्याप उमेदवारांची यादी जाहीर केली नाही.**

राहतील.यासोबतच कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि निवडणूक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बसवराज बोम्मई आणि प्रचार समितीच्या प्रमुख शोभा करंदलाजे या देखील उपस्थित राहू शकतात, असे सूत्रांचे म्हणणे आहे. अलीकडेच झालेल्या निवडणूकपूर्व सर्वेक्षणात, २२४ विधानसभेच्या जागा असलेल्या या राज्यात काँग्रेसला ११५ ते १२७ जागा तर भाजपला केवळ ६० ते ८० जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. किंगमेकर बनू पाहणाऱ्या धर्मनिरपेक्ष जनता दलाच्या वाट्याला २३ -३५ जागाच येतील, असेही या सर्वेक्षणात भाकीत वर्तविण्यात आले आहे.

## प. बंगालमध्ये तणाव कायम, पोलिसांवर दगडफेक; तीन जखमी

। हावडा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

पश्चिम बंगालमधील हावडा शहरातील काजीपाडा भागात रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान हिंसाचाराची घटना घडली होती. यानंतर बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांवर शुक्रवारी काही व्यक्तींनी दगडफेक केली. यामुळे तणाव वाढला असून पोलिसांनी कलम १४४ लागू केले आहे.

जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीमार करावा लागला. काजीपाडा परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले आहे. हिंसाचाराच्या गुरुवारच्या घटनेपासून आतापर्यंत ४४ जणांना अटक करण्यात आली आहे. "शुक्रवार दुपारपर्यंत परिसरात शांततापूर्ण तणाव होता. परंतु पोलिसांवर दगडफेकीची घटना घडल्यानंतर तणाव वाढला. पोलिसांनी या घटनेनंतर काही व्यक्तींना अटक केली." असे पोलीस



अधिकाऱ्यांनी सांगितले.

हिमनद्या वितळत असल्याचा केवळ हिमालयातीलच नदी प्रणालीवर गंभीर परिणाम होणार नसून त्यामुळे दरडी कोसळणे, हिमस्खलन यासारख्या आपत्तींचे प्रमाणही वाढू शकते. त्याचप्रमाणे, हिमनद्या वितळल्याचा परिणाम हिमालयातील वृक्षरेषेवर तसेच वनस्पतींच्या वर्तनावरही होऊ शकतो, असा इशाराही विभागातर्फे देण्यात आला आहे.पोलिसांवर दगडफेकीची घटना घडल्यानंतर वाहनांची वर्दळ थांबली. लोकांनी घरात राहणे पसंत केले. दगडफेकीत किमान तीन पोलीस जखमी झाले. त्यापैकी एकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. धडक कृती दलाचे एक पथक शुक्रवारी दुपारी या भागात तैनात केले आहे.


# अजयच्या ‘भोला’ पाठोपाठ आता नानीचा ‘दसरा’ चित्रपट झाला लीक



दाक्षिणात्य अभिनेता नानी सध्या त्याच्या ‘दसरा’ या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. नानीने अनेक चित्रपटांतून काम करुन प्रेक्षकांची मनं जिंकली. ‘हिट’, ‘जर्सी’, ‘मख्खी’, ‘पैसा’ यांसारख्या चित्रपटांमधून नानीने अभिनयाचा ठसा उमटवला. नुकताच त्याचा ‘दसरा’ चित्रपट प्रदर्शित झाला आहे. प्रदर्शनाच्या दिवशी तो ऑनलाईन लीक झाला आहे.

‘दसरा’ चित्रपटाचा टीझर आल्यापासूनच चित्रपटाची हवा होती. अनेकांना हा चित्रपट पुष्पासारखा वाटला. छोट्याश्या गावातील एक मुलगा त्याच्या लोकांसाठी संघर्ष करताना दिसला आहे. टीझरमध्ये दमदार डायलॉग ऐकायला मिळाले. मात्र झूमने दिलेल्या माहितीनुसार आता हा चित्रपट ऑनलाईन लीक झाल्याचं सांगितलं जात आहे. ‘दसरा’चे निर्माते आता यावर कडक कारवाई करणार असे सांगितले जात आहे. काही मीडिया रीपोर्टनुसार ‘ अभिनेता अजय देवगणचा भोला चित्रपटदेखील ऑनलाईन लीक झाल्याचं स्पष्ट झालं आहे. प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी अजय देवगणचा ‘भोला’ एचडी क्वालिटीमध्ये लीक झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. इतकंच नव्हे तर बऱ्याच पायरेट साइट्सवर हा चित्रपट उपलब्ध असल्याचा दावाही काही लोकांकडून केला जात आहे.

# विराटचा हात सुटेना...' गेट वे ऑफ इंडियावर आले, हवाच झाली!



भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी प्रसिद्ध अभिनेत्री अनुष्का शर्मा हे नेहमीच वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत असतात. सोशल मीडियावर त्यांची क्रेझ मोठी आहे. भारतामध्ये तर सर्वाधिक फॉलोअर्स असणारा खेळाडू म्हणून विराटची ओळख आहे. तर पत्नी अनुष्का आता विविध सामाजिक कामांमध्ये सक्रिय असल्याचे दिसून आले आहे. सध्या हे दोघेही सेलिब्रेटी मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे एका कार्यक्रमाच्या निमित्तानं एकत्र आले होते. अनुष्कानं यलो कलरचा ड्रेस परिधान केला होता. तर विराटचा लूकही प्रभावी होता. अशावेळी त्यांच्या इंट्रीची वेगळीच झलक पाहायला मिळाली. त्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्याला नेटकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे.

# सलमान झालाय 'अण्णा'

बॉलिवूडचा भाईजान अर्थात सलमान खान सध्या त्याच्या आगामी 'किसी का भाई किसी की जान' या सिनेमामुळे चर्चेत आहे. या सिनेमाची त्याचे चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. अशातच आता सिनेमातील 'बथुकम्मा' ) हे नवं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे



बथुकम्मा' हे गाणं सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. या गाण्यातील सलमान खानचा लुक खूपच हटके आहे. 'किसी का भाई किसी की जान' या सिनेमातील 'नय्यो लगदा', 'बिल्ली बिल्ली' आणि 'जी रहे थे हम' ही गाणी प्रेक्षकांच्या भेटीला आली असून आता 'बथुकम्मा' हे चौथं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. या गाण्याने चाहत्यांना वेड लावलं आहे. बथुकम्मा' या गाण्यात सलमान खान दाक्षिणात्य लुकमध्ये दिसत आहे. तेलुगू आणि हिंदीभाषेत असणाऱ्या या गाण्याची बॉलिवूडसह दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतदेखील चांगलीच क्रेझ आहे. भाईजानने सोशल मीडियावर या गाण्याचा व्हिडीओ शेअर केला आहे. व्हिडिओ शेअर करत त्याने लिहिलं आहे,"बथुकम्मा गाणं आऊट". या गाण्यात सलमानसह पूजा हेगडेदेखील दिसत आहे.

तगडी स्टारकास्ट असलेला 'किसी का भाई किसी की जान'

'किसी का भाई किसी की जान' या सिनेमात सलमान खान मुख्य भूमिकेत आहे. तसेच वेंकटेश दग्गुबाती, जगपती बाबू, भूमिका चावला, अभिमन्यू सिंह, शहनाज गिल, जस्सी गिल,राघव जुयाल, सिद्धार्थ निगम आणि पलक तिवारी हे कलाकारदेखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. या सिनेमाच्या माध्यमातून शहनाज गिल हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण करत आहे.


# ऐश्वर्या रायवर त्रिशा कृष्णन पडली भारी

प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांच्या 'पोन्नियन सेल्वन' चित्रपट मागच्या बऱ्याच काळापासून चर्चेत आहे. या चित्रपटात बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनची मुख्य भूमिका असून नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटात तिच्यासोबत अभिनेत्री त्रिशा कृष्णनही महत्वपूर्ण भूमिकेत आहे. या चित्रपटात ऐश्वर्याची जरी मुख्य भूमिका साकारत तरी ‘पोन्नियन सेल्वन’ या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्चच्या वेळी मात्र वेगळे चित्र दिसले. ‘पोन्नियन सेल्वन’च्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटमध्ये ऐश्वर्यापेक्षा अभिनेत्री त्रिशा कृष्णन हिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. बॉलिवूड अभिनेत्री ऐश्वर्या रायच्या सौंदर्यावर करोडो लोक फिदा आहेत. ऐश्वर्या तिच्या सौंदर्याने सर्वांना खिळवून ठेवते. ‘पोन्नियन सेल्वन’ या चित्रपटाच्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटला ऐश्वर्या आणि त्रिशा कृष्णन दोघीही हजर होत्या. अशात दोघींना पाहून सोशल मीडियावर प्रेक्षक त्यांची तुलना लागले आणि यात तृषा भाव खाऊन गेली. या कार्यक्रमदारम्यान त्रिशाने गुलाबी रंगाची साडी नेसली होती. या साडीत ती फार सुंदर दिसत होती. तर ऐश्वर्यने काळ्या रंगाचा ड्रेस आणि त्याच रंगाची ओढणी घेतली होती. त्रिशाच्या लुकला नेटकऱ्यांनी अधिक पसंती दिली. तिच्यापुढे ऐश्वर्या रायचा लुक एकदम फिका ठरला. ‘पोन्नियन सेल्वन’च्या ट्रेलर लॉन्च इव्हेंटसाठी ऐश्वर्यनि निवडलेल्या या आऊटफिटवर नेटकऱ्यांनी टीका केली. ऐश्वर्याचा लुक पाहून अनेकांनी तिला ट्रोल केलं.





# ॲक्शनच्या डोलाऱ्यावर ‘भोला’चे तांडव



'रामनवमीच्या पावन मुहूर्तावर प्रदर्शित झालेला ‘लोकेश युनिव्हर्स’च्या प्रसिद्ध कैथी चित्रपटाचा रिमेक असलेल्या ‘भोला’ चित्रपटाकडून सिनेप्रेमींमध्ये उत्कंठा होती, रिमेक बनविण्याची चटक लागलेले बॉलिवूडवाले ओरिजनल चित्रपटाला किती न्याय देईल, याची अजय देवगणच्या चाहत्यांसह प्रेक्षकांना चिंताच होती. पॉपकॉन तोंडात टाकत नाही, तोपर्यंत एकामागे एक सुरू होणारे ॲक्शन सीन दिपवणारे आहेत.

थ्रीडीमध्ये बघितल्यास सणासुदीला खर्च करून पुरे वसूल झाल्याची दाट भावना येऊ शकते. अभिनय, संगीत, सिनेमॅटोग्राफी, दिग्दर्शन सर्वच गोष्टी उत्तम जुळून आल्या आहेत. कैथी चित्रपटाचा ‘आत्मा’ समजून घेण्यात मात्र दिग्दर्शक कमी पडला असला तरी भोला बघितल्यानंतर ‘चलो ये भी ठीक है’ असे वाक्य तोंडातून बाहेर पडतात."

# गुजरात टायटन्सची विजयी सलामी!

## गतविजेत्यांचा चेन्नई सुपर किंग्सवर पाच गडी राखून विजय

। अहमदाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएलच्या १६व्या हंगामाला शुक्रवारी (३१मार्च) सुरुवात झाली. अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर इंडियन प्रीमिअर लीग २०२३ स्पर्धेचा पहिला सामना पार पडला. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात गतविजेत्या गुजरात टायटन्सने चार वेळचा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्जचा पाच गडी राखून पराभव केला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या या विजयासह गुजरातने चेन्नईविरुद्धची आपली अपराजित मोहीम सुरू ठेवली.**

सीएसकेवरचा हा त्याचा सलग तिसरा विजय आहे. आजवर गुजरातचा पराभव झालेला नाही. शुबमन गिलला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.



# एम एस धोनी रचणार इतिहास

## ‘या’ खास विक्रमाला घालणार गवसणी?

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**जागतिक क्रिकेटमध्ये दिग्गज खेळाडूंपैकी एक असलेला एम एस धोनी यशाचं नवीन शिखर गाठण्यासाठी सज्ज झाला आहे. गतवर्षी इंडियन प्रीमियर लीगमध्ये पदार्पणातच जेतेपदावर शिक्कामोर्तब करणाऱ्या गुजरात टायटन्सविरोधात चेन्नई सुपर किंग्ज भिडणार आहे.**



आज सायंकाळी हे दोन्ही संघ अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये आमने-सामने येणार आहेत. २००८ पासून सुरू झालेल्या आयपीएलमध्ये दर वर्षी नवीन विक्रमाला गवसणी घालण्यात आली आहे. दरम्यान, यंदाच्या आयपीएलच्या १६ व्या हंगामात महेंद्र सिंग धोनी पाच हजार किंवा त्याहून अधिक धावांचा पल्ला पार करत नवीन विक्रम करू शकतो. पाच हजार धावा पूर्ण केल्यानंतर अशी कामगिरी करणारा धोनी सातवा खेळाडू बनेल.

धोनीने टी-२० लीगमध्ये आतापर्यंत ४९७८ धावा कुटल्या आहेत. त्याने दोन फ्रँचायजी चेन्नई सुपर किंग्ज आणि रायझिंग पुणे सुपरजायंट्सचं कर्णधारपद सांभाळलं आहे. यंदाही धोनीच्या नेतृत्वाखाली सीएसके मैदानात उतरणार आहे. जर धोनीने गुजरात टायटन्सविरोधात आज होणाऱ्या पहिल्या सामन्यात २२ धावा केल्या, तर आयपीएलमध्ये धोनीच्या नावावर पाच हजार धावांची नोंद होईल. आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट कोहली अव्वल स्थानावर आहे. त्याने २२३ सामन्यांमध्ये ६६२४ धावांपर्यंत मजल मारली आहे.

### धोनीच्या नावावर पाच हजार धावांची नोंद

**» धोनीने टी-२० लीगमध्ये आतापर्यंत ४९७८ धावा कुटल्या आहेत. त्याने दोन फ्रँचायजी चेन्नई सुपर किंग्ज आणि रायझिंग पुणे सुपरजायंट्सचं कर्णधारपद सांभाळलं आहे. यंदाही धोनीच्या नेतृत्वाखाली सीएसके मैदानात उतरणार आहे. जर धोनीने गुजरात टायटन्सविरोधात आज होणाऱ्या पहिल्या सामन्यात २२ धावा केल्या, तर आयपीएलमध्ये धोनीच्या नावावर पाच हजार धावांची नोंद होईल. आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट कोहली अव्वल स्थानावर आहे.**

त्यानंतर शिखर धवन, डेविड वॉर्नर, रोहित शर्मा, सुरेश रैना आणि एबी डिविलियर्स यांच्या नावांची नोंद आहे. गुजरातविरोधात होणाऱ्या पहिल्या सामन्यात धोनीच्या फिटनेसबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. धोनीला किरकोळ दुखापत झाली असल्याचं बोललं जात आहे.

# मायकल वॉनचा वनवास संपला!

## बारा वर्षांनंतर ‘या’ गंभीर आरोपातून झाली मुक्तता

। नवी दिल्ली। महाईन्यूज
। वृत्तसंस्था ।



इंग्लंड संघाचा माजी कर्णधार मायकल वॉनवरील वर्णद्वेषाचे आरोप फेटाळण्यात आले आहेत. शिस्तपालन समितीने त्याच्यावरील वर्णद्वेषाचे आरोप फेटाळून लावले आहेत. २००९ मध्ये यॉर्कशायर संघात समाविष्ट असलेल्या आशियाई वंशाच्या खेळाडूंच्या गटावर वांशिक टिप्पणी केल्याचा आरोप या दिग्गजावर करण्यात आला होता. या प्रकरणात वॉनला १२ वर्षांनंतर दिलासा मिळाला आहे.

मायकेल वॉनने आज, (३१ मार्च २०२३ रोजी) स्वतः ट्विट करुन माहिती देताना सांगितले की, ‘इंग्लंड क्रिकेट बोर्डाच्या शिस्तपालन आयोगाने त्याला वर्णद्वेषी आणि भेदभावपूर्ण भाषा वापरल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त केले आहे.’ या प्रकरणाची लंडनमध्ये सुनावणी तीन सदस्यीय समितीसोबत झाली. पॅनेलने आपला निकाल जाहीर करताना वॉनची निर्दोष मुक्तता केली आहे.या

क्रिकेटर अझीम रफिकने मायकेल वॉनवर आरोप केला होता की, इंग्लंडच्या माजी कर्णधाराने टी-२० सामन्यादरम्यान त्याला आणि इतर आशियाई वंशाच्या खेळाडूंना लक्ष्य केले होते.

### खेळाडूंनी मायकेल वॉनवर आरोप केले होते

**» खरं तर, २००९ मध्ये अझीम रफिकने मायकल वॉनवर वर्णद्वेषाचा आरोप केला होता, तेव्हा मायकल वॉन यॉर्कशायरकडून क्रिकेट खेळत होता. अझीमशिवाय आदिल रशीद, राणा नावेद-उल-हसन आणि अजमल शहजाद यांनीही वॉनवर वर्णद्वेषाचा आरोप केला होता. यापूर्वी इंग्लंडचा माजी कर्णधार वॉनने आपल्यावरील आरोप आणि केलेल्या वादग्रस्त ट्विटबद्दल माफी मागितली होती. वॉनने कबूल केले की, केसच्या सुनावणीदरम्यान ईसीबीचे प्रमुख वकील जेन मुल्काही केसी यांनी जवळपास ९० मिनिटे चौकशी केली, तेव्हा त्याचे ट्विट अस्वीकार्य होते. दरम्यान, वॉनने या ट्विटबद्दल माफी मागितली होती.**